**निशाणी क्र. ०८ खाली आदेश**

(दिनांक २२ माहे जून २०२६ रोजी पारीत)

०१. अर्जदार/दावेक—याच्या वारसांनी दावेक—याच्या मृत्युमुळे संदर्भ अर्ज बंद होण्याच्या मान्यता आदेश आणि त्यांना वारस म्हणून अभिलेखावर येण्यास झालेला विलंब माफ करावा, अशी मागणी केलेली आहे.

०२. अर्जदारांनुसार, दावेकरी हा १०.०१.२०२६ रोजी मयत झालेला आहे; परंतु ते मयताचे कुटुंबिय असल्याने दु:खात होते, तेव्हा वकिलास भेटून त्यांना आवश्यक ती माहिती देवून त्यांना स्वत :ला अभिलेखावर घेवू शकले नाहीत, तेव्हा अर्ज हा बंद झाला, अशी मान्यता आहे, तेव्हा त्यांना जो विलंब झालेला आहे, तो जाणिवपूर्वक केलेला नसल्याने ता माफ करावा अन्यथा संदर्भ अर्ज गुणवत्तेवर निर्णयीत न होता प्रकरणाचे अनेकीकरण होईल, तेव्हा अर्ज मंजूर करावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. गैरअर्जदारांनी सदरच्या अर्जाला अर्जदारांनी विलंब माफ करण्यासाठी पुरेसे कारण दिलेले नाही, तेव्हा विलंब माफ करता येणार नाही म्हणून अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०४. अर्जदारांच्या वतीने वकील श्री. आर. व्ही. भोसले यांना ऐकले, तर गैरअर्जदारांच्या वतीने सहा. सरकारी वकील श्री. के. डी. कोळपे यांना ऐकले.

०५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २२ नियम १ अन्वये वादी किंवा प्रतिवादी यांच्या मृत्यूमुळे, जर का त्यांचा किंवा त्यांच्याविरुद्ध दावा पुढे चालविण्यायोग्य त्यांना वारस असतील तर तो बंद होत नाही तर नियम ३ अन्वये वादीच्या वारसांच्या अर्जावरुन

त्यांना मयताऐवजी अभिलेखावर बदलले जावू शकते. जेव्हा त्या सबंधाने विलंब झाला तर तो न्यायालयाचे समाधान झाल्यावरून की, त्यासाठी पर्याप्त कारण दिलेले आहे, तो विलंब माफ केला जावू शकतो.

०६. उपरोक्त पार्श्वभूमीवर अर्जदारांचा अर्ज विचारात घेतला तर हे स्पष्ट आहे की, त्यांना सदरचा अर्ज करण्यासाठी केवळ १७ दिवसाचा विलंब झालेला आहे, जो गैरअर्जदार यांनी देखील फारसा मोठा आहे, असे कथन केलेले नाही. तेव्हा प्रकरण गुणवत्तेवर निर्णयीत करण्यासाठी अर्जदारांना मयत दावेक–याचे वारस म्हणून बदलणे आवश्यक असल्याने त्यांना झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

## आदेश

१. अर्ज विनंतीप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे;

२. अर्जदारांना दावेक–याऐवजी वारस म्हणून अभिलेखावर बदलून घेण्यास आणि त्यामुळे मयताच्या विरुद्ध दावा बंद झाल्याच्या आदेशाच्या मान्यतेला रद्दबातल करून घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.06.22 18:16:24 +0530

दिनांक: २२.०६.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division Bhoom, Tq. Bhoom, Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 22.06.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 22.06.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 22.06.2026 |